**"विनाअनुदान" व "कायम विनाअनुदान" तत्वावर परवानगी दिलेल्या व मूल्यांकनात पात्र घोषित करण्यात आलेल्या मान्यताप्राप्त खाजगी प्राथमिक व माध्यमिक शाळांना द्यावयाच्या अनुदान सूत्रामध्ये सुधारणा करुन सरसकट २० टक्के प्रमाणे अनुदान देणेबाबत...**

**महाराष्ट्र शासन**
**शालेय शिक्षण व क्रीडा विभाग**
**शासन निर्णय क्रमांक : माशामु-२०१६/प्र.क्र.१८/एसएम-४,**
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक : १९ सप्टेंबर, २०१६.

**वाचा :-** (१) शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग क्रमांक:-
व्हीएलएस-७०८८/८७८९/प्राशि-१, दिनांक २८ एप्रिल, १९८९,
(२) शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग क्रमांक:-
नमाशा-१०९९/१०७६/९९/माशि-१, दिनांक ११ ऑक्टोबर, २०००,
(३) शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग क्रमांक:-
माशाअ-१००३/५१६/०३/ माशि-१, दिनांक १७ फेब्रुवारी, २००४,
(४ ) शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग क्रमांक:-
माशाअ २००९/५९९/०९/ माशि-१, दिनांक २० जुलै, २००९,
(५ ) शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग क्रमांक:-
माशाअ- २००९/५९९/०९/माशि-१, दिनांक १५ नोव्हेंबर, २०११,
(६) शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग क्रमांक:-
संकीर्ण- २०१२/१५०/१२/माशि-१, दिनांक १६ जुलै, २०१३.

**प्रस्तावना :-**

**१.१** राज्यातील खाजगी प्राथमिक व माध्यमिक शाळांच्या अनुदान सूत्रामध्ये कालपरत्वे खालील प्रमाणे वेळोवेळी सुधारणा करण्यात आल्या आहेत.

**१.२** शासन निर्णय, दिनांक २८ एप्रिल, १९८९ अन्वये राज्यातील खाजगी व्यवस्थापनातर्फे चालविण्यात येणा-या शाळांना चौथ्या वर्षी २५ टक्के, पाचव्या वर्षी ५० टक्के, सहाव्या वर्षी ७५ टक्के व सातव्या वर्षी १०० टक्के प्रमाणे वेतन अनुदान देण्यात येत होते.

**१.३** शासन निर्णय दिनांक ११ ऑक्टोबर, २००० अन्वये शाळांना दिल्या जाणा-या वेतन अनुदानाच्या सूत्रात बदल करण्यात आला. त्यानुसार शाळा सुरु झाल्याच्या पाचव्या वर्षी २० टक्के, सहाव्या वर्षी ४० टक्के सातव्या वर्षी ६० टक्के, आठव्या वर्षी ८० टक्के व नवव्या वर्षी १०० टक्के असे वेतन अनुदान सुत्र व मुल्यांकनाचे निकष ठरविण्यात आले आहे.

**१.४** शासन निर्णय दिनांक १७ फेब्रुवारी, २००४ नुसार मूल्यांकनाच्या निकषामध्ये सुधारणा करण्यात आली.

**१.५** दिनांक २४ नोव्हेंबर, २००१ च्या मंत्रिमंडळ बैठकीमध्ये राज्यात नवीन शाळांना परवानगी देतांना "कायम विनाअनुदान" तत्वावर परवानगी देण्याचा निर्णय घेण्यात आला होता. त्यानुसार राज्यामध्ये (इंग्रजी माध्यम वगळता) सुमारे २००० प्राथमिक व २००० माध्यमिक शाळांना कायम विनाअनुदान तत्वावर परवानगी देण्यात आली. म्हणजेच या प्रत्येक शाळेकडून ते केंव्हाही अनुदान मागणार नाहीत या आशयाचे हमीपत्र लिहून घेऊनच परवानगी देण्यात आली होती. तरी सुध्दा सदर शाळांना अनुदान लागू करण्याची मागणी सर्व संबंधित घटकांकडून वारंवार शासनाकडे करण्यात येत होती. त्यामुळे कायम विनाअनुदान तत्वावर परवानगी दिलेल्या प्राथमिक व माध्यमिक शाळांच्या (इंग्रजी माध्यमाच्या शाळा वगळून) परवानगी आदेशातील "कायम" शब्द वगळण्याचा निर्णय दिनांक २० जूलै, २००९ च्या शासन निर्णयान्वये घेण्यात आला. या निर्णयानुसार सुधारीत मुल्यांकन निकष आणि अनुदान सूत्र निश्चित करण्यासाठी **सचिव, शालेय शिक्षण** यांचे अध्यक्षतेखाली **सचिव समितीची** नियुक्त करण्यात आली होती. या समितीने प्रस्तावित केलेले निकष सुधारीत करुन आवश्यक प्रस्ताव मंत्रीमंडळापुढे सादर करण्यात आला होता.

**१.६** त्यानुसार शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, दि.१५ नोव्हेंबर, २०११ अन्वये मूल्यांकनाचे निकष व अनुदान सूत्र विहित करण्यात आले आहे. या निकषांमध्ये दिनांक १६ जुलै, २०१३ च्या शासन निर्णयान्वये पुन्हा काही सुधारणा करण्यात आल्या.

**१.७** राज्यात "कायम" शब्द वगळल्यानंतर झालेल्या विनाअनुदानित तसेच मूलत: विनाअनुदानित पात्र शाळा आहेत. त्यांना अजून अनुदान सुरु झालेले नाही. या शाळांना अनुदान सुरु करावयाचे आहे. सध्याची राज्याची आर्थिक स्थिती, आर्थिक संसाधने, राज्याच्या गरजा व त्यांचा प्राधान्यक्रम विचारात घेऊन, शासन निर्णय, दिनांक १५ नोव्हेंबर, २०११ मधील ११ (अ) येथील तरतुदीनुसार अनुदान सुत्रामध्ये सुधारणा करणे अगत्याचे आहे. सदर शाळांना अनुदान देण्यासाठी सुधारीत अनुदान योजना लागू करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**१.८** त्यानुसार मंत्रीमंडळाच्या दिनांक १४ जून, २०१६ रोजीच्या बैठकीमध्ये मुल्यांकनाच्या निकषानुसार अनुदानास पात्र ठरलेल्या शाळा व तुकडयांमधील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचा-यांना २० टक्के प्रमाणे अनुदान देण्यास तत्वत: मान्यता देण्यात आली होती. त्यानंतर मंत्रीमंडळाच्या दिनांक ३० ऑगस्ट, २०१६ रोजीच्या बैठकीमध्ये अनुदानास पात्र ठरलेल्या शाळा व तुकडयांमधील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचा-यांना पुढील आदेशापर्यत सरसकट २० टक्के प्रमाणे अनुदान देण्यास काही अटी व शर्तीच्या अधिन राहून मान्यता देण्यात आली आहे.

**<u>शासन निर्णय</u>** :-

**२.१** विनाअनुदान व कायम विनाअनुदान तत्वावर परवानगी दिलेल्या व मूल्यांकनात पात्र म्हणून घोषित करण्यात आलेल्या तथापि, अद्याप प्रत्यक्ष अनुदान सुरु न झालेल्या मान्यताप्राप्त खाजगी प्राथमिक व माध्यमिक शाळांना द्यावयाच्या अनुदान सूत्रामध्ये सुधारणा करुन, शासनाच्या पुढील आदेशापर्यंत, सरसकट २० टक्के प्रमाणे अनुदान सूत्र विहित करण्यात येत आहे.

**२.२** त्यानुसार, दिनांक १४ जून, २०१६ पूर्वी वेळोवेळी निर्गमित करण्यात आलेल्या शासन निर्णयांद्वारे अनुदानास पात्र घोषित करण्यात आलेल्या १६२८ शाळा व २४५२ तुकडयांमधील शिक्षक व शिक्षकेतरांना खालील अटी व शर्तीच्या अधीन राहुन सरसकट २० टक्के अनुदान मंजूर करण्यात येत आहे.

**अटी व शर्ती :-**

**१)** शासन निर्णय, दिनांक १५ नोव्हेंबर, २०११ मधील तरतुदीनुसार शासनाने वेळोवेळी दिनांक १४ जून, २०१६ पर्यंत निर्गमित केलेल्या शासन निर्णयांद्वारे, ज्या शाळा व तुकडयांना २० टक्के, ४० टक्के, ६० टक्के, ८० टक्के व १०० टक्के अनुदानाचा टप्पा मंजूर करण्यात आलेला आहे तथापि, त्यांना प्रत्यक्ष अनुदान सुरु झालेले नाही, अशा सर्व शाळा व तुकडयांना शासनाच्या पुढील आदेशापर्यंत **सरसकट** २० टक्के प्रमाणे अनुदान अनुज्ञेय राहील.

**२)** सदर अनुदान सन २०१५-१६ च्या **संचमान्यतेनुसार** मंजूर असलेल्या शिक्षक व शिक्षकेत्तर पदांनाच अनुज्ञेय राहील.

**३)** सदर अनुदान हे या शासन निर्णयातील अटी व शर्तींची पूर्तता केल्याच्या दिनांकापासून अनुज्ञेय राहील व ते भूतलक्षी प्रभावाने अनुज्ञेय राहणार नाही.

**४)** ज्या शाळांमधील विद्यार्थी, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांची उपस्थिती **बायोमेट्रीक** प्रणाली द्वारे नोंदविण्यात येत आहे, अशाच शाळांना अनुदान अनुज्ञेय राहील.

**५)** ज्या शाळांमध्ये शेवटच्या वर्गातील विद्यार्थी पटसंख्या ३० पेक्षा कमी असेल तसेच डोंगराळ व दुर्गम भागातील शाळांमध्ये शेवटच्या वर्गातील विद्यार्थी पटसंख्या २० पेक्षा कमी असेल अशा शाळांना अनुदान अनुज्ञेय राहणार नाही. या शाळा अनुदान पात्रतेच्या निकषांमध्ये बसत नसल्यामुळे अशा शाळा स्वयं-अर्थसहाय्यित शाळा समजण्यात येतील.

**६)** शासन निर्णय, दिनांक १५ नोव्हेंबर, २०११ मधील निकषांप्रमाणे शाळा जरी अनुदानास पात्र ठरत असली तरी शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचा-यांच्या पद भरती संदर्भात **"आरक्षण धोरणाचे"** पालन केलेले नसेल अशा शाळांना अनुदान अनुज्ञेय राहणार नाही व अशा शाळा हया स्वयं-अर्थसहाय्यित शाळा समजण्यात येतील.

**७)** शाळेमधील सर्व शिक्षकांच्या आधारकार्डसह वैयक्तिक मान्यतेचे आदेश **"सरल"** प्रणालीत भरल्याशिवाय कोणतेही अनुदान अनुज्ञेय राहणार नाही.

**८)** सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचा-यांना **"राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजनेत"** समाविष्ट होणे बंधनकारक राहील. त्याशिवाय संबंधितांना अनुदान अनुज्ञेय राहणार नाही.

**९)** सदरहू शाळांमधील सध्या रिक्त असलेल्या व भविष्यात रिक्त होणाऱ्या पदांवरील शिक्षक भरती सेवाप्रवेश विषयक प्रचलित नियमानुसार करणे बंधनकारक राहील.

**१०)** शासनाद्वारे वेळोवेळी घेण्यात आलेल्या निर्णयांमधील तरतुदीनुसार ज्या शाळांमध्ये विद्यार्थी पटसंख्या किमान निकषापेक्षा कमी असेल अशा शाळा बंद करण्यात याव्यात व त्या शाळांमधील विद्यार्थ्यांचे समायोजन नजिकच्या शाळेत करण्यात यावे. विद्यार्थी समायोजित केल्यामुळे अशा शाळांना अनुदान अनुज्ञेय राहणार नाही.

**११)** सर्व शाळांचे जिल्हा शैक्षणिक प्रणालीवरील **( यु-डायस )** क्रमांक आणि शाळेत शिकत असलेल्या विद्यार्थ्यांचे **"आधारकार्ड"** असणे आवश्यक आहे. आधार क्रमांकाच्या आधारे विद्यार्थी संख्या ग्राहय धरण्यात येईल.

**३. शैक्षणिक गुणवत्ता** :- प्राथमिक व उच्च प्राथमिक शाळेच्या संदर्भात सर्व वर्ग प्रगत असावेत. तसेच माध्यमिक शाळेच्या संदर्भात इयत्ता ९ वी व १० वी च्या वर्गांचा निकाल १०० टक्के असावा. शाळेतील कोणत्याही वर्गासाठी वरील निकष प्राप्त करण्यात कोणतीही शाळा सलग तीन वर्षे अपयशी ठरल्यास

शाळेची मान्यता काढून शाळा बंद करण्यात यावी व शाळेतील विद्यार्थ्यांना नजीकच्या शाळेमध्ये समायोजित करण्यात यावे.

**४. क्षेत्रिय कार्यालयाची जबाबदारी** :-

**४.१** प्रत्यक्ष अनुदान वितरीत करण्यापूर्वी **"सरल"** प्रणालीनुसार सर्व माहितीची सत्यता पडताळणीची संयुक्तिक जबाबदारी संबंधित शिक्षणाधिकारी व विभागीय शिक्षण उपसंचालक यांची राहील.

**४.२** या शासन निर्णयाद्वारे अनुदान द्यावयाच्या शाळांना क्षेत्रिय अधिका-यांच्या स्तरावर यापूर्वीच्या काळात नियमबाहय वेतन अनुदान दिल्याचे लक्षात आल्यास अशा शाळांना अनुदान देण्यात येऊ नये व अशा अनियमिततेसंदर्भात संबंधित अधिका-यांविरुध्द शिस्तभंगविषयक विभागीय चौकशीची कारवाई सुरु करण्यात यावी. याबाबतची जबाबदारी आयुक्त (शिक्षण) यांच्यावर सोपविण्यात येत आहे.

**४.३** या शाळांमध्ये शिक्षक व शिक्षकेत्तर पदे सन २०१५-१६ च्या संचमान्यतेनुसार रिक्त असल्यास शासकीय व खाजगी अनुदानित शाळांमध्ये अतिरिक्त ठरलेल्या शिक्षक व शिक्षकेतर कर्मचा-यांना समायोजनाने सामावून घेणे बंधनकारक राहील.

**५. शासनाचा स्वेच्छाधिकार** :- अनुदानासाठी शाळा पात्र झाली म्हणजे त्या शाळेस अनुदानाचा हक्क प्राप्त होत नाही. संबंधित शाळांना अनुदान लागू करणे हा शासनाचा **"स्वेच्छाधिकार"** असून निधीच्या उपलब्धतेनुसार शासन निकषपात्र शाळांना अनुदान लागू करील. सदर अनुदान हे भूतलक्षी प्रभावाने लागू केले जाणार नाही. तसेच, शाळांना विना अनुदान तत्वावर कोणत्याही शैक्षणिक वर्षात मान्यता दिलेली असली तरी, राज्याची आर्थिक स्थिती, वेळोवेळी उपलब्ध होणारी आर्थिक संसाधने, राज्याच्या गरजा व त्यांचा प्राधान्यक्रम विचारात घेऊन, शासन अनुदानाच्या सूत्रात बदल करील व ज्या शाळांना अनुदान सुरू करण्यात आलेले नाही, त्या शाळांना जेव्हा अनुदान सुरू करावयाचे असेल त्यावेळचे अनुदान सूत्र त्यांना लागू राहील.

**६.** हा शासन निर्णय वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्रमांक २०१६/४७४/व्यय-५, दिनांक १४ सप्टेंबर, २०१६ नुसार निर्गमित करण्यात येत आहे.

**७.** सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक क्रमांक २०१६०९१९१४०४५४७१२१ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने सांक्षाकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नावाने,

Ramchandra Ganpat Gunjal

Digitally signed by Ramchandra Ganpat Gunjal
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Deputy Secretary, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=dc74b0493b4979ad0aa76763f873c23fa35ecb44970562d4aa14a832b6357e54, cn=Ramchandra Ganpat Gunjal
Date: 2016.09.19 15:11:22 +05'30'

**( रा.ग.गुंजाळ )**
उपसचिव,महाराष्ट्र शासन.

**प्रति,**

१) मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव,मंत्रालय, मुंबई,
२) मा.मंत्री, शालेय शिक्षण यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई,
३) मा.मंत्री, वित्त व़ नियोजन यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई,

४) मा.मुख्य सचिव यांचे सहसचिव,मंत्रालय, मुंबई,
५) मा.प्रधान सचिव (शा.शि.व क्री.) यांचे विशेष कार्य अधिकारी,
६) आयुक्त (शिक्षण),महाराष्ट्र राज्य, पुणे,
७) शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक)महाराष्ट्र राज्य, पुणे,
८) शिक्षण संचालक (प्राथमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे,
९) सर्व विभागीय शिक्षण उपसंचालक,
१०) सर्व शिक्षणाधिकारी (प्राथमिक/माध्यमिक) सर्व जिल्हा परिषदा,
११) शिक्षण निरीक्षक (पश्चिम/उत्तर/दक्षिण) बृहन्मुंबई,
१२) वित्त विभाग कार्यासन-व्यय-५/नियोजन विभाग कार्यासन-१४७१,
१३) सर्व सहसचिव/उपसचिव/अवर सचिव/कक्ष अधिकारी शा.शा.वि. शिक्षण व क्रीडा विभाग,
१४) निवडनस्ती (एसएम-४).